भतवाल हॉस्पिटल
म्हणजेच
गंगाराम हॉस्पिटल
अग्रवाल नगर,मालेगाव रोड, धुळे
मो.नं. 9158587711


# आपला महाराष्ट्र

मूल्य २.००

संस्थापक - लोकमित्र भाई मदाने

WWW.APLAMAHARASHTRA.IN

संयुक्त वर्ष ६९ ■ अंक क्र.२३३ ■ बुधवार २७ मे २०२६ ■ धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक आवृत्ती ■ पाने ४

POST REGD.NO./DHL/53/24-26


डॉ.गौतम शाह धुळ्यात उपलब्ध
गुडघे दुखी, कंबरदुखी, स्लीप डिस्क, संधीवात, सायटीका या रुग्णांवर ओझोन थेरपी व गुडघ्याची इंजेक्शन थेरपीने यशस्वी उपचार
**दि.२९ मे ते २ जुन २०२६ या कालावधीत धुळे येथे उपलब्ध असणार आहेत.**
संपर्क :- **डॉ.गौतम शाह M.S.** (ऑर्थो) शाह क्लिनिक श्री.विठ्ठल हॉस्पीटल, जुने आस्था हॉस्पीटल, रामवाडीसमोर, मालेगावरोड, धुळे (फोन नं.०२५६२-२३५११३)
भ्रमणध्वनी-०८६००३५१०००/९८८१२७८६९८

## कांदा उत्पादकांच्या परिस्थितीला सरकार जबाबदार
## सळो की पळो करणार : आंदोलक शेतकऱ्यांचा इशारा

**नाशिक/मुंबई, दि.२६- कांद्याला सध्या प्रति क्विंटल दोनशे ते तीनशे रुपये एवढा कमी भाव मिळत आहे. त्यामुळे कांदा उत्पादक शेतकऱ्यांची परिस्थिती विदारक झाली आहे. या परिस्थितीला भाजपाचे केंद्रातील मोदी सरकार व राज्यातील देवेंद्र फडणवीस सरकारच जबाबदार आहे, असा हल्लाबोल करत आज नाशिक जिल्ह्यातील चांदवड येथे महामोर्चा काढत रास्तारोको आंदोलन करण्यात आले. शेतकऱ्यांना कांद्यासाठी समाधानकारक हमीभाव मिळाल्याशिवाय काँग्रेस पक्ष व महाविकास आघाडी स्वस्थ बसणार नाही. सरकारला सळो की पळो करून सोडणार, असा इशारा महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ आणि राष्ट्रवादीचे आमदार रोहित पवार यांनी दिला. आंदोलकांनी वाहनांच्या चाकांमधील हवा काढल्यामुळे पोलिसांनी आक्रमक होत काही आंदोलकांना स्थानबद्ध केले.**



कांद्याला तीन हजार रुपये प्रति क्विंटल भाव मिळावा, या मागणीसाठी नाशिक जिल्ह्यातील चांदवड चौफुली येथे महाविकास आघाडीच्यावतीने शेतकरी क्रांती महामोर्चा काढण्यात आला. यावेळी रास्ता रोको आंदालन देखील करण्यात आले. या आंदोलनात काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, राष्ट्रवादी काँग्रेसचे (श.प.) प्रदेशाध्यक्ष आमदार शशिकांत शिंदे, शिवसेना (उबाठा) आमदार अंबादास दानवे, आमदार रोहित पवार, खा. शोभा बच्छाव, खा. भगरे गुरुजी, काँग्रेसचे नाशिक ग्रामीण जिल्हा अध्यक्ष भारत टाकेकर, रमेश कहांडोळे, नाशिक शहर काँग्रेसचे अध्यक्ष बबलू खैरे तसेच महाविकास आघाडीचे नेते, पदाधिकारी आणि शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. रास्ता रोको आंदोलनादरम्यान पोलिसांनी बळाचा वापर करून नेत्यांना ताब्यात घेतले, मात्र शेतकऱ्यांचा संघर्ष दडपून टाकता येणार नाही. सरकार हमसे डरती है, पुलिस को आगे करती है, अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला. (पान ४ वर)

## कांदा पंधरा रूपये किलो
## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



मुंबई, दि. २६ : राज्यात सुरू असलेल्या कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कांद्याच्या दरात साडेतीन रूपयांची वाढ झाली आहे, असे सांगितले. कांदा जवळपास पंधरा रूपये किलोने खरेदी होत आहे. तर राज्यात इंधन बावन्न टक्के अधिक खरेदी करण्यात येत आहे, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कांदा आंदोलनाच्या आणि इंधन तुटवड्याच्या पार्श्वभूमीवर दिली. मंत्रिमंडळ बैठकीनंतर प्रसारमाध्यमांशी बोलताना त्यांनी विरोधकांच्या आंदोलनाचा खरपूस समाचार घेतला. तसेच राज्यातील इंधन पुरवठ्याबाबत सर्व जिल्हाधिकाऱ्यांना महत्त्वाचे आदेश जारी केले आहेत. कांदा दरावरून (पान ४ वर)

## दिडशे कोटींचे कर्ज घेण्यास महासभेने दिली मंजुरी
## विरोधी नगरसेवकांचे परखड सवाल व सभात्याग

**धुळे, दि.२६- महानगरपालिकेत केंद्र शासन पुरस्कृत अमृत २.० योजना अंतर्गत धुळे शहरात मलनिस्सारण योजनेच्या दुसऱ्या टप्प्यातील कामांसाठी मनपा हिस्स्याची तीस टक्के रक्कम अर्थात १४९.७७ कोटी रूपयांचे कर्ज महाराष्ट्र अर्बन इन्फ्रास्ट्रक्चर फंड ट्रस्टी कंपनी मर्यादीत यांच्याकडून घेण्याच्या विषयाला मंजुरीसाठी महासभा घेण्यात आली. महासभेत कर्ज घेण्याच्या विषयाला विरोधकांचा निषेध नोंदवून मंजुरी देण्यात आली. महासभेचे अध्यक्षस्थान महापौर मायादेवी परदेशी यांनी भुषवले.**



भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृहात घेण्यात आलेल्या महासभेप्रसंगी आयुक्त नितीन कापडणीस, उपमहापौर ज्योत्सना पाटील, नगरसचिव मनोज वाघ यांच्यासह विविध प्रभागांमधील नगरसेवक उपस्थित होते. यावेळी सत्ताधारी भाजपाच्या नगरसेवककांनी धुळेकर जनतेच्या आरोग्याच्या दृष्टीने योजना गरजेची असल्याचे सांगितले. त्याला एमआयएमच्या नगरसेवकांनी पाठींबा दिला. परंतू राष्ट्रवादी व शिवसेना आघाडीच्या नगरसेवकांनी विरोध दर्शवत सभात्याग केला. सभात्याग करणाऱ्या नगरसेवकांचा सत्ताधाऱ्यांनी यावेळी निषेध केला.

मलनिस्सारण योजनेच्या दुसऱ्या टप्प्यासाठी मनपा हिस्स्याची तीस टक्के रक्कम भरण्यासाठी १४९.७७ कोटींचे कर्ज काढण्याचा विषय प्रशासकीय काळात दि.२२ मे २०२५ रोजी मंजूर करण्यात आला आहे. त्यास महासभेची मंजूरी मिळणे आवश्यक असल्याने तो महासभेसमोर ठेवण्यात आला. कर्ज घेतल्यानंतर दोन वर्षांनी कर्जाचे (पान ४ वर)

## आई वडील ज्येष्ठ नागरिक संस्थेचे बेमुदत धरणे
## संयुक्त बैठकीच्या आश्वासनानंतर आंदोलन मागे

**नंदुरबार, दि२६- नंदुरबार हुडको कॉलनीतील समाज मंदिराची इमारत आई वडील व ज्येष्ठ नागरिक कल्याण संस्थेला हस्तांतरित करण्याच्या मागणीवरून सुरू असलेले आंदोलन आणि त्याला स्थानिक रहिवाशांकडून होणारा विरोध यावर तोडगा काढण्यासाठी नंदुरबार नगर परिषदेने एक पाऊल पुढे टाकले आहे. या वादावर सविस्तर चर्चा करण्यासाठी दि.३ जून २०२६ रोजी दुपारी १२ वाजता मुख्याधिकाऱ्यांच्या दालनात एका संयुक्त बैठकीचे आयोजन करण्यात आले असून, मुख्याधिकाऱ्यांनी ज्येष्ठ नागरिकांना आंदोलन मागे घेण्याची विनंती केली आहे.**



राज्य ज्येष्ठ नागरिक धोरण २०१३ शासनाचे सर्वसमावेशक ज्येष्ठ नागरिक धोरण २०१३ मधील तरतुदींनुसार, स्थानिक स्वराज्य संस्थांनी (नगर परिषदेने) त्यांच्या ताब्यातील इमारती ज्येष्ठ नागरिकांच्या विरंगुळा केंद्रासाठी नाममात्र दरात किंवा मोफत उपलब्ध करून देणे बंधनकारक आहे. जिल्हाधिकाऱ्यांचे सलग तीन आदेश मा. जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली पारपडलेल्या जिल्हा (पान ४ वर)

## उष्णतेचा कहर झाल्याने
## जळगावात चौघांचा मृत्यू

जळगाव, दि. २६ : गेल्या चोवीस तासांत राज्यातील अमरावती आणि जळगाव या दोन जिल्ह्यांमध्ये एकूण अकरा जणांचा वेगवेगळ्या घटनांमध्ये गूढ आणि धक्कादायक मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. तीव्र उष्णतेचा फटका आणि उष्माघात यामुळेच हे मृत्यू झाल्याचा प्राथमिक अंदाज वैद्यकीय सूत्रांनी वर्तवला आहे. मे महिन्याच्या उत्तरार्धात राज्यातील तापमानाचा पारा पंचेचाळीस अंश सेल्सिअसच्या पुढे गेल्याने ही परिस्थिती अत्यंत चिंताजनक बनली आहे. अकरा मृतांमध्ये चार जण जळगाव जिल्ह्यातील आहेत.

जळगाव जिल्ह्यात उष्णतेच्या लाटेने मोठा फटका बसला असून चार जणांचा मृत्यू (पान ४ वर)

### भाजपा शिक्षक आघाडीची मागणी
## सुट्टीतील जनगणनेचे काम अर्जित रजेत धरा
## कर्मचाऱ्यांना ५० लाखांचे विमा संरक्षण द्या

**धुळे, दि.२६ - जनगणना २०२७ अंतर्गत सुरू असलेल्या घरगणना कार्यामध्ये राज्यभरातील शिक्षक, प्रगणक, पर्यवेक्षक तसेच विविध विभागांतील शासकीय कर्मचारी मोठ्या प्रमाणावर कार्यरत असताना त्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. वाढत्या उष्णतेच्या पार्श्वभूमीवर जनगणना कर्मचाऱ्यांना तातडीने विमा संरक्षण, सानुग्रह अनुदान तसेच आवश्यक सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी जोरदार मागणी भाजपा शिक्षक आघाडीचे नाशिक विभाग संयोजक महेश मुळे यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी जनगणना कार्य संचालनालयाच्या संचालक डॉ. निरुपमा डांगे यांना सविस्तर निवेदन सादर केले आहे.**

राज्यात १६ मे २०२६ पासून जनगणना २०२७ च्या पहिल्या टप्प्यातील घरगणना कार्याला सुरुवात झाली असून ग्रामीण तसेच शहरी भागांमध्ये शिक्षक व कर्मचारी प्रत्यक्ष क्षेत्रीय स्तरावर घरभेटी देत माहिती संकलनाचे काम करत आहेत. मात्र, राज्यात सध्या तीव्र उष्णतेची लाट सुरू असून अनेक भागांत तापमान ४५ अंश सेल्सिअसच्या पुढे गेले आहे. अशा प्रतिकूल वातावरणात जनगणना कर्मचारी सलग मैदानी काम करत असल्याने त्यांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होत असल्याची बाब निवेदनातून अधोरेखित करण्यात आली आहे.

विशेष म्हणजे, मागील काही दिवसांत राज्यातील तीन कर्मचारी जनगणना कार्य बजावत असताना मृत्युमुखी पडल्याच्या घटना घडल्या असून, देशभरातील अशा घटनांची (पान ४ वर)

## चांदगडला तीन मुलींचा
## शेततळ्यात बुडून मृत्यू

कोल्हापूर, दि. २६ : कोल्हापूरच्या चंदगडमध्ये आजीच्या अन्त्यविधीसाठी आलेल्या तीन शाळकरी मुलींचा हंडेवाडी येथे शेततळ्यात बुडून मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली. या घटनेमुळे गावात हळहळ व्यक्त होत असून कुटुंबीयांवर दु:खाचा डोंगर कोसळला आहे. पोलिसांनी पुढील तपास सुरू केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, रिया आणि धनुष्का यांच्या वडिलांची आई तसेच स्वराच्या आईची आई असलेल्या सुशीला सांबरेकर यांचे आठ दिवसांपूर्वी निधन झाले होते. त्यांच्या अंत्यविधीच्या निमित्ताने कुटुंबीय हंडेवाडी येथे जमले होते. सोमवारी दुपारी तिन्ही मुली (पान ४ वर)



## नंदुरबार वैद्यकीय महाविद्यालयाच्या
## कामांना गती द्या; ना.मुश्रीफांचे निर्देश

**नंदुरबार,दि.२६ (प्रतिनिधी) - नंदुरबार येथे उभारण्यात येत असलेल्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व संलग्न रुग्णालयाच्या कामांचा आढावा वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी मंत्रालयात आयोजित बैठकीत घेतला. यावेळी बांधकामाची सद्यस्थिती, निधी, पाणी व वीजपुरवठा तसेच प्रलंबित कामांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.**

बैठकीस वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाचे सचिव धीरज कुमार, संबंधित अधिकारी तसेच नंदुरबार जिल्हाधिकारी डॉ. मित्ताली सेठी आणि शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. संजय राठोड दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते.

मंत्री हसन मुश्रीफ म्हणाले की, नंदुरबारसारख्या आदिवासी व दुर्गम जिल्ह्यात अत्याधुनिक वैद्यकीय शिक्षण व दर्जेदार आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी राज्य शासन कटिबद्ध आहे. वैद्यकीय महाविद्यालयाच्या कामांना आवश्यक गती देत प्रकल्प वेळेत पूर्ण करण्यासाठी सर्व संबंधित यंत्रणांनी समन्वयाने काम करावे.

महाविद्यालयाच्या कामांसाठी आवश्यक रस्ते, वीज व पाणीपुरवठा या मूलभूत सुविधांची पूर्तता (पान ४ वर)

## पालकमंत्री जयकुमार रावलांच्या
## सुचनेनुसार बुराईत पाणी सोडणार

**धुळे, दि. २६- जिल्ह्याचे पालकमंत्री तथा राज्याचे पणन व राजशिष्टचार मंत्री जयकुमार रावल यांच्या सुचनेनुसार जिल्ह्यातील वाडीशेवाडी मध्यम प्रकल्पातून बुराई नदीच्या पात्रात १५०.७२५ दशलक्ष घनफूट पाणी सोडण्याचे निर्देश जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते यांनी पाटबंधारे विभागाला दिले आहेत.**



शिंदखेडा तालुक्यातील बुराई नदीकाठच्या २५ गावांमध्ये पाणीटंचाई जाणवत आहे. या पार्श्वभूमीवरवाडीशेवाडी मध्यम प्रकल्पातील आरक्षित पाणीसाठ्यातून १५०.७२५ दलघफू पाणी आवर्तन स्वरूपात सोडण्याचे आदेश देण्यात आले आहेत. या प्रकल्पात ६९८.७४ दशलक्ष्ज्ञ घनफूट उपयुक्त जलसाठा उपलब्ध आहे. त्यातून पिण्याच्या पाण्यासाठी आवश्यक असलेले पाणी उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. संबंधित विभागांनी पाणी सोडण्याची (पान ४ वर)

## नीट परीक्षा प्रकरणी
## कारवाई करा- भाकप

धुळे, दि.२६- नीट परीक्षा पेपर फुटीच्या गंभीर प्रकरणातील क्लास चालक, आरोपी प्राध्यापक व इतर दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी. या मागणीचे निवेदन भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी केंद्रीय शिक्षण मंत्री, मुख्यमंत्री, वैद्यकीय शिक्षण मंत्री यांना जिल्हाधिकाऱ्यांच्या माध्यमातून देण्यात आले.

निवेदनात नमूद केले आहे की, शिक्षणासारख्या पवित्र क्षेत्रामध्ये भ्रष्ट मार्गाने पैसा कमावण्यासाठी विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळ करणाऱ्यांवर कारवाई होणे गरजेचे आहे. नाशिक येथील मेडिकलचा विद्यार्थी खैरनार, (पान २ वर)



## पिंपळनेर येथील वीज उपकेंद्राचे
## भूमिपूजन, काम रेंगाळण्याची शक्यता

**पिंपळनेर, दि. २६ (प्रतिनिधी)- तब्बल पाच वर्ष रेंगाळणाऱ्या १३२ / ३३ केव्ही वीज उपकेंद्राचे भूमिपूजन आज आ.मंजुळा गावित यांच्या हस्ते झाले.मात्र स्थानिक लोकांनी जागे संदर्भात आपला आक्षेप नोंदवला असल्याने हे काम अजून किती वर्षे रेंगाळेल?असा प्रश्न निर्माण झाला आहे. लोकप्रतिनिधीचा जनतेच्या कामातील पाठपुराव्यात कमी तर पडत नाही ना?असा प्रश्न लागलेल्या विलंबामुळे निर्माण झाला आहे.**

याबाबतची अधिक माहिती अशी की पिंपळनेर येथील १३२/ ३३ केव्ही वीज (पान २ वर)

### सोनगीर येथील
## श्रीराम व शेवंताई नगरात पाणीटंचाई

सोनगीर, दि. २६ (प्रतिनिधी) - येथील श्रीराम नगर आणि शेवंताई नगर वसाहतीमध्ये गेल्या काही महिन्यांपासून तीव्र पाणीटंचाई निर्माण झाली आहे. पाण्याचा प्रश्न सोडवण्याबाबत स्थानिक ग्रामपंचायत प्रशासन आणि लोकप्रतिनिधी दुर्लक्ष करत असल्याचा आरोप या वस्तीतील रहिवाशांनी केला आहे.

श्रीराम नगर परिसरात गेल्या पाच महिन्यांपासून नळांना पाणी आलेले नाही. त्यामुळे नागरिकांना पाण्यासाठी मोठी भटकंती करावी लागत आहे. या समस्येबाबत स्थानिक नागरिकांनी लोकप्रतिनिधींकडे (पान २ वर)

दिपक ज्वेलर्स
सोने- 22 K -1,42,850 रु.+3% GST
सोने- 24 K -1,56,000 रु.+3% GST
चांदी- 2,67,000 रु.+3% GST
तारगल्ली, सराफ बाजार, धुळे
फोन नं.२३३१०३/२३४१०३



## कापूस लागवडीच्या कामांना वेग आला
## पण वीजेच्या खेळखंडोबाने ब्रेक लागला

**सोनगीर, दि. २६ (प्रतिनिधी) - सध्या परिसरातील शेतकरी कापूस लागवडीच्या कामात व्यस्त असतानाच, शेतीच्या विजेचा प्रश्न अत्यंत गंभीर बनला आहे. शासनाचे शेतीसाठी दिवसातून आठ तास वीज पुरवठा करण्याचे धोरण असले, तरी प्रत्यक्षात मात्र वीज आणीबाणीच्या नावाखाली वारंवार भारनियमन केले जात आहे. महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी (महावितरण) शेतकऱ्यांची थट्टा करत असल्याचा गंभीर आरोप आता ग्रामस्थांकडून होत आहे.**

सोनगीर येथील ३३/११ केव्ही वीज उपकेंद्रातून सोनगीर, सोंडले, डांगुर्णे,सरवड, देवभाने, दापोरा, दापुरी, सायने, नंदाने, वाघाडी, वालखेडा, कंचनपूर, डोंगरगाव शिवारातील शेतीसाठी विद्युत पुरवठा केला जातो. महावितरणच्या चक्राकार पद्धतीच्या धोरणानुसार दिवसातून आठ तास वीज (पान २ वर)

## मनपा हद्दवाढीतील
## प्रॉपर्टी कार्ड मिळणार

धुळे, दि.२६ - धुळे ग्रामीणमधील मात्र मनपा हद्दवाढीतील अकरा महसुली गावांमध्ये सिटी सर्व्हे लागू करण्याची अनेक वर्षांपासूनची मागणी होती. त्यास यश आले आहे. नागरिक पाणीपट्टी आणि घरपट्टी भरतात, पण त्यांच्याकडे अधिकृत 'सीटीएस' नंबर नसल्याने बँकेत कर्ज मिळवताना अडचणी येत होत्या. या अडचणी सोडविण्यासाठी महसुल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे विशेष बैठक झाली होती. मनपा हद्द वाढीतील गावांना पुन्हा सर्व्हे करून त्यांना 'सीटीएस' नंबर देण्याचे आदेश पारीत झाले होते. आता मिळकत (पान २ वर)

## गुलमर्ग मध्ये हवेत लटकले केबल कारचे पाळणे
## बचाव पथकांनी तीनशे जणांना सुखरूप वाचविले

श्रीनगर/गुलमर्ग, दि. २६ : जम्मू-काश्मीरमधील जगप्रसिद्ध पर्यटन स्थळ असलेल्या गुलमर्गमध्ये सोमवारी दुपारी दुर्घटना टळली. आशियातील सर्वात उंचावर असलेली गोंडोला केबल कार सेवा अचानक तांत्रिक बिघाडामुळे ठप्प झाली. यामुळे वेगवेगळे पासष्ट पाळणे जमिनीपासून शेकडो फूट उंचावर हवेतच लटकून राहिले. या पाळण्यांमध्ये लहान मुले आणि महिलांसह देशातील विविध राज्यांतून आलेले सुमारे तीनशे ते सव्वातीनशे पर्यटक अडकले होते. त्यातच गुलमर्गमध्ये अचानक



मुसळधार पाऊस, गारपीट आणि वेगवान वादळी वारा सुरू झाल्याने पर्यटकांमध्ये प्रचंड घबराट पसरली होती. भारतीय लष्कर, जम्मू-काश्मीर पोलीस, एसडीआरएफ, एनडीआरएफ आणि स्थानिक प्रशासनाने सहा ते सात तासांच्या प्रयतकानंतर सर्व पर्यटकांना सुखरूप जमिनीवर आणण्यात यश (पान २ वर)

## बाभळे जलशुद्धी केंद्राच्या
## तांब्याच्या प्लेटची चोरी

धुळे, दि.२६ - धुळे शहराला स्वच्छ पाणीपुरवठा करणाऱ्या महापालिकेच्या जलशुद्धीकरण केंद्रावरून ७०० किलो कॉपर वायर, प्लेट, बायंडींग तार चोरट्यांनी लंपास केल्या. बाभळे फाटा येथे धुळे महानगरपालिकेचे जलशुद्धीकरण केंद्र आहे. सुपरवायझर विजय राजाराम पाटील यांनी शिंदखेडा पोलिसात फिर्याद दिली, त्यानुसार सप्टेंबर २०२५ ते १४ मे २०२६ पर्यंत जलशुद्धीकरण केंद्र आवारातून चोरांनी एकूण ७ लाख रुपये किंमतीची कॉपरचे साहित्याला पास केले. याप्रकरणी पोलिसात गुन्हा दाखल झाला.

## सरवड फाट्यावर गोवंश धरलेली
## ॲम्ब्युलन्स पाठलाग करुन पकडली

सोनगीर दि. २६( प्रतिनिधी) - रुग्णांना वेळेवर उपचार मिळण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या रुग्णवाहिकाचा वापर चक्क गोवंशाच्या बेकायदेशीर तस्करीसाठी केला जात असल्याचा धक्कादायक प्रकार सोनगीर पोलीस स्टेशनच्या हद्दीत उघडकीस आला आहे. गोरक्षकांनी दिलेल्या अचूक माहितीच्या आधारे सोनगीर पोलिसांनी पाठलाग करून एका विना नंबरच्या टाटा कंपनीच्या रुग्णवाहिकेमधून निर्दयतेने डांबलेले ११ गोवंश जप्त केले आहेत. पोलिसांना पाहताच अज्ञात चालक गाडी सोडून पसार झाला असून, पोलिसांनी १ लाख ७५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, दि. २६ मे रोजी पहाटेच्या सुमारास शिरपूरकडून धुळ्याच्या दिशेने एका ॲम्बुलन्सधून गोवंशाची बेकायदेशीर वाहतूक होत असल्याची खात्रीशीर माहिती सजग गोरक्षकांना मिळाली होती. गोरक्षकांनी तातडीने याबाबीची माहिती सोनगीर पोलिसांना दिली. माहिती मिळताच, पहाटे ६:३० वाजेच्या सुमारास (पान २ वर)

## धुळ्यातील तरुणाचा
## गोव्यात बुडून मृत्यू

धुळे, दि.२६ - येथील गल्ली क्रमांक पाच मधील रहिवासी तरुण सुट्या असल्याने मित्रांसोबत गोवा येथे फिरायला गेला. तेथील स्विमिंग टँक मधील पाण्यात बुडून त्याचा मृत्यू झाल्याची घटना घडली.

योगेश उर्फ पिंटू नाना चौधरी (वय ४०, रा. महापालिका शाळा क्रमांक नऊजवळ, हिंदू एकता चौक) असे त्याचे नाव आहे. पुणे येथे एका नामांकित कंपनीत नोकरीस होता. योगेश हा त्याच्या कंपनीतील कर्मचारी मित्रांसह कंपनीने दिलेल्या सुट्ट्यांदरम्यान दोन दिवसांपूर्वी गोवा येथे फिरायला गेला. (पान २ वर)

## एबी फाऊंडेशनतर्फे मोफत शस्त्रक्रीया
## गरजुंनी लाभ घ्यावा - आ.अनुप अग्रवाल

**धुळे, दि.२६ - शहराचे आमदार अनुप अग्रवाल यांच्या दातृत्वातील एबी फाउंडेशनतर्फे आजपासून १५ जूनपर्यंत शहरासह जिल्ह्यातील गरजू रुग्णांसाठी विविध आजारांवरील उपचारांसाठी मोफत शस्त्रक्रिया अभियानास प्रारंभ झाला. या अभियानाचा लाभ घेण्यासाठी गरजू रुग्णांनी एबी फाउंडेशनच्या कार्यालयात संपर्क साधावा, असे आवाहन आमदार अग्रवाल यांनी केले आहे.**

आरोग्य सेवा परमो धर्मचे ब्रीद जोपासत एबी फाउंडेशनतर्फे सुमारे वर्षभरापासून सामाजिक बांधिलकीच्या उद्देशाने धुळे शहरासह जिल्हाभरातील रुग्णांसाठी आरोग्य सेवेचे काम करत आहे. फाउंडेशनने आतापर्यंत हजारो रुग्णांवर आवश्यक ते उपचार, शस्त्रक्रिया करून त्यांना नवीन जीवन मिळवून देण्यात मोलाची भूमिका बजावली आहे. यासाठी फाउंडेशनचे आश्रयदाते आमदार अनुपभय्या अग्रवाल यांच्या मार्गदर्शनात विविध उपक्रम राबविले जात आहेत.



आता मोफत शस्त्रक्रिया अभियान

गंभीर आजार आणि त्यावरील उपचारांसह शस्त्रक्रियांचा मोठा खर्च यामुळे अनेक सामान्य कुटुंबांना मानसिक आणि आर्थिक त्रासाला सामोरे जावे लागते. अनेकदा पैशांअभावी उपचारांना उशीर होतो. यामध्ये रुग्णांच्या जिवाला धोकाही निर्माण होतो. सर्वसामान्य रुग्णांची हीच अडचण ओळखून शहराचे लोकप्रिय आमदार आणि अनुपभय्या अग्रवाल यांच्या मार्गदर्शनाखाली एबी फाउंडेशनतर्फे २६ मे ते १५ जून या कालावधीत मोफत शस्त्रक्रिया अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत शासनाच्या कुठल्याही योजनेत (पान २ वर)

सेंद्रिय जांभुळ

संकेत नित्या फार्मचे
उत्कृष्ट सेंद्रिय जांभुळ
उपलब्ध
✻ संपर्क ✻
वेळ : सकाळी ११ ते रात्री ८ वाजेपर्यंत
दै.आपला महाराष्ट्र कार्यालय
वीर सावरकर मार्ग-धुळे. ०२५६२-२३५३९६, २३८३९६

आपला महाराष्ट्र

# शिक्षणात चिंताजनक पडझड: अनेक पिढ्या गारद

शिक्षण क्षेत्रातील दोन महत्त्वाच्या बातम्या समोर आल्या आहेत आणि त्या अतिशय गंभीर म्हणाव्या लागतील. निती आयोगाच्या अहवालानुसार देशात २०१४-१५ ते २०२४-२५ या दहा वर्षात लाखभर शाळा बंद झाल्या आहेत. त्यात ९४००० सरकारी आणि ४००० सरकारी अनुदानित शाळांचा समावेश आहे. त्याचवेळी ५१ हजार खाजगी शाळा वाढलेल्या असल्याचे अहवाल सांगतो. ही आकडेवारी निती आयोगाची म्हणजे सरकारी आहे. सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे देशातील १४ लाख शाळांमध्ये एक कोटी शिक्षक आहेत ग्रामीण आणि दुर्गम भागात प्रादेशिक विषमता तसेच पायाभूत सुविधांच्या अभावी शिक्षकांची कमतरता आहे. देशातील ७९३ शाळांमध्ये एकाही विद्यार्थ्यांचा प्रवेश झालेला नाही. एक लाख चार हजार एकशे पंचवीस शाळा एक शिक्षकी आहेत. या दशकभरातील शिक्षणावरील सार्वजनिक खर्च जीडीपीच्या तुलनेत ३.८७ ते ४.२४ टक्के आहे तो अपेक्षित सहा टक्के पेक्षाही कमी असून. ही स्थिती अतिशय गंभीर म्हणावी लागेल २०२४ पंचवीस मध्ये एकूण शाळांची संख्या आहे १४ लाख ७१ हजार. त्यात सरकारी शाळा दहा लाख १३ हजार, अनुदानित शाळा ७९ हजार, खाजगी मान्यताप्राप्त शाळा तीन लाख ३९ हजार आणि मदरसा तसेच तत्सम शाळा ३९ हजार आहेत. या पार्श्वभूमीवर एक लाख शाळा बंद होणे आणि खाजगी शाळा वाढणे तसेच विद्यार्थ्यांची प्रवेश संख्या कमी होणे ही शिक्षण क्षेत्रातील मोठी पडझड म्हणावी लागेल. इंग्रजी शाळा तसेच सेमी इंग्रजी शाळांचे पेव फुटले आहे. खेड्यापाड्यात मुलांना घेण्यासाठी या शाळांच्या गाड्या येतात. त्या गाड्यांमध्ये आधुनिक वेशभूषेत विद्यार्थी जाताच आणि येतात. त्यात कष्टकऱ्यांची मुले देखील आहेत आणि कष्टकऱ्यांना असे वाटते की आमचीही मुले इंग्रजी शिकली पाहिजेत. मुद्दा कोणते शिक्षण घेतले पाहिजे असा नसून जीवन शिक्षण मिळते की नाही हा आहे आणि ते मिळत नाही हे वास्तव आहे.

सगळी मुले दहावीनंतर किंवा बारावीनंतर इंग्रजी माध्यमातून बाहेर पडतात आणि कॉलेजमध्ये जातात. कॉलेजमध्ये सर्व विषयांचे माध्यम इंग्रजीत असते तरीही ते कच्चे असतात याचे कारण काय हा संशोधनाचा विषय आहे. याचा अर्थ स्पष्ट असा आहे इंग्रजी शाळा ज्यांनी ज्यांनी काढल्या त्यांनी त्यात पैसा ओतला. तो परत मिळावा आणि नफा मिळावा म्हणून खेड्यापाड्यातील मुलांची भरती येथे करण्यात येते परंतु शिक्षक अप्रशिक्षित असतात ते देखील इंग्रजी माध्यमातीन असतात. प्रशिक्षित शिक्षकांच्या तुलनेत यांचे शिक्षण कमकुवत ठरते. मातृभाषेचा अभाव असतो. विद्यार्थी ना इकडचा ना तिकडचा अशी त्याची अवस्था होते. परिणामी जे निष्कर्ष पुढे आलेले आहेत त्यात नीट च्या पेपर फुटीचे उदाहरण मोठे म्हणावे लागेल. पाया कच्चा असल्यामुळे ते पुढे टिकत नाहीत म्हणून मग चोऱ्या करून उत्तीर्ण होणे आणि वेगवेगळ्या क्षेत्रातील जागा बळकवणे असे उद्योग सुरू आहेत. राजस्थानात एकाच घरातील पाच मुले निरनिराळ्या ठिकाणी वैद्यकीय शिक्षणासाठी प्रवेश घेतात आणि त्यांची चोरी सापडते. बारावीपर्यंत ५० ते ६० टक्क्यां पेक्षा अधिक गुण त्यांना मिळत नाहीत मात्र नीट मध्ये ते प्रचंड यशस्वी होतात आणि त्यांचा प्रवेश निश्चित होतो. त्याचवेळी या शिक्षणाने असा एक वर्ग तयार केलेला आहे की तो यूपीएससी आणि एमपीएससी या पलीकडे जाऊ इच्छित नाही. त्यासाठी पात्रता नसताना किंवा आर्थिक कुवत नसताना लोक कर्ज काढून वेगवेगळ्या ठिकाणी अभ्यासासाठी मुलांना पाठवतात. बरेच यशस्वी होतात आणि बरेच नापास होतात हे दोघेही शहरात आणि खेड्यात नोकरी शिवाय पडलेले आहेत. त्यांच्या विवाहाचे प्रश्न निर्माण झालेले आहेत. त्यांना कुठलाही रोजगार नाही. वडिलांच्या भरोशावर ते रोज जगतात. मग या शिक्षणाने काय दिले तर निराशा दिली असेच म्हणावे लागेल.

फारच कमी विद्यार्थी किंवा तरुण-तरुणी आधुनिक शिक्षणाचा फायदा मेहनत करून घेतात आणि वरच्या पदापर्यंत पोहोचतात त्यांची संख्या फारच कमी आहे. मुद्दा असा आहे की इंजिनियर डॉक्टर या वहिवाटीच्या पलीकडे जाऊन लोक शिक्षणाच्या संदर्भात वेगळा विचार करीत नाहीत हे दुर्दैवाच म्हणावे लागेल. अशावेळी धोरणकर्त्यांनी नेमके काय केले पाहिजे असा विचारच सरकार समोर आणि शिक्षण तज्ज्ञासमोर नाही. त्यामुळे अनेक पिढ्या गारद होत आहेत. सरकारी प्राथमिक शाळा जिल्हा परिषद आणि नगरपरिषदांच्या अखत्यारीत असलेल्या बंद होत आहेत. त्यामुळे त्यात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची दशा आणखी वेगळी आहे. त्यांना आपल्या गावात शाळा नसल्यामुळे तीन ते दहा किलोमीटर अंतर पार करून दुसऱ्या शाळेत जावे लागते. महाराष्ट्रातील चार हजार गावे, पाडे या ठिकाणी मुलांना घराजवळ शाळा उपलब्ध नसल्यामुळे बाहेरगावची शाळा गाठावी लागते आणि रोज पायपीट करावी लागते ही अवस्था पुरोगामी महाराष्ट्रात निर्माण झालेली आहे. पटसंख्ये अभावी शाळा बंद होते ,शाळे अभावी मुले प्रवाहाच्या बाहेर फेकले जात आहेत अशा फेऱ्यात शिक्षण व्यवस्था सापडलेली आहे. एखाद्या गावात शाळा असली तरी ज्या माध्यमात हवी त्या माध्यमातून ती उपलब्ध नसते.मराठी शाळा त्यास हवी असल्यास ती मिळत नाही हे कशाचे लक्षण आहे ? कशीबशी चौथ्या वर्गापर्यंतची शाळा गावात चालू आहे. जिल्हा परिषदेच्या ताब्यात असलेल्या या शाळांमध्ये फारसे प्रवेश होत नाहीत. अशावेळी तेथील शिक्षक खिशातील पैसा खर्च करून आणि विद्यार्थ्यांच्या घरी जाऊन त्यांचे समुपदेशन करतात त्यांना शाळेत आणतात. त्यांना कपडे देतात, पुस्तके देतात, दप्तर देतात आणि खायलाही देतात त्यामुळे कशाबशा ह्या शाळा सुरू आहेत अशा मुला मुलींना शिक्षक तालीम देतात. ही बाब वाटते तेवढी सोपी नाही. परंतु ज्या शिक्षकांना पोट तिडकीने गरिबांची मुले शिकली पाहिजेत असे वाटते असे शिक्षक मनापासून त्या मुला मुलींवर संस्कार टाकण्याचा प्रयतन करतात. त्यांचे खरे तर कौतुक केले पाहिजे आणि आभार देखील मानले पाहिजेत. ते आजच्या व्यवस्थेवर उपकार करतात असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही.त्या शिक्षकांच्याही पोटा पाण्याचा प्रश्न असतो म्हणूनही ते धडपड करतात. वेशीबाहेर शाळेत जाणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रवास भत्ता देण्याचा शासनाचा निर्णय नुकताच झालेला आहे. ही केवळ डागडुजी असून यामागे मूलभूत विचार झालेला नाही कुठेतरी जबाबदारी टाळण्याचे उद्योग सरकार देखील करते हे दुर्दैव म्हणावं लागेल. शिक्षण हक्क कायद्यानुसार विद्यार्थ्यांच्या घरापासून एक किलोमीटरच्या परिसरात प्राथमिक शाळा असणे आवश्यक आहे .तर माध्यमिक शाळा पाच किलोमीटरच्या परिसरात असणे अपेक्षित आहे ती उपलब्ध करून देणे ही शासनाची जबाबदारी आहे. ती जबाबदारी पूर्ण करू शकत नसल्याने शासनाने प्रवास भत्याचा नवा फंडा निर्माण केला. जरी प्रवास भत्त्याची घोषणा शासनाने केली असली तरी कोकणा सारख्या विभागात खाडी ओलांडून शाळेत जावे लागते. त्यासाठी कुठलीही सुविधा लवकर उपलब्ध होत नाही. काही ठिकाणी जंगल आहे. आणि अनेक ठिकाणी सोयीच्या एसटीच्या बसेस नाहीत त्यामुळे त्या विद्यार्थ्यांची परवड काही थांबत नाही. हे एक उदाहरण आहे. असे अनंत प्रश्न शिक्षण क्षेत्रात निर्माण झालेले आहेत.आणि धोरणकर्ते तसेच त्या क्षेत्रातील तज्ञ सकारात्मक निष्कर्ष निघेल असा काही विचार करीत नाही. जेव्हा करतील तो सुदिन म्हणावा लागेल. हा प्रश्न केवळ शिक्षणव्यवस्थेचा नाही, तर भारताच्या सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक भवितव्याचा आहे.सरकारी शिक्षण व्यवस्थेची पडझड, व्यापारीकरणामुळे शिक्षणाचे बाजारीकरण,शिक्षण आणि रोजगार यांच्यात निर्माण झालेली खोल दरी. अशी त्यात गंभीर मुद्दे असून त्यावरच नेमका कोणी विचार करीत नाही.

अनेक ठिकाणी शिक्षक स्वतःच अपुरे प्रशिक्षित असतात. मुलांची मातृभाषा, स्थानिक वास्तव, जीवनमूल्ये यांच्याशी शिक्षणाचा संबंध राहत नाही. परिणामी विद्यार्थी ना मातृभाषेत सक्षम राहतो, ना इंग्रजीत पूर्ण प्रावीण्य मिळवतो. तो ना इकडचा ना तिकडचा अशी त्याची अवस्था होते. सध्या तीच परिस्थिती राज्यात आहे.

याचा परिणाम पुढे स्पर्धा परीक्षांच्या विकृत संस्कृतीत दिसतो. शिक्षणाचा उद्देश ज्ञान, कौशल्य आणि सामाजिक जाणीव निर्माण करणे हा राहिलेला नाही; तर केवळ परीक्षा उत्तीर्ण होणे हा झाला आहे. त्यामुळे नीट, यूपीएससी, एमपीएससी अशा परीक्षांभोवती अवास्तव आकर्षण निर्माण झाले. लाखो तरुण वर्षानुवर्षे तयारी करतात; अनेकांचे वय, पैसा आणि मानसिक उर्जा खर्च होते. काही जण यशस्वी होतात; परंतु मोठा वर्ग अपयशानंतर बेरोजगारी, नैराश्य आणि सामाजिक असुरक्षिततेत अडकतो. शिक्षणाने जीवन जगण्याची क्षमता द्यायला हवी होती; पण ते अनेकदा केवळ स्पर्धेचे रणांगण बनले आहे.अशा परिस्थितीत शिक्षण क्षेत्रात काही मूलभूत बदल गरजेचे आहेत.सरकारी शिक्षण मजबूत करणे,जिल्हा परिषद आणि नगरपरिषद शाळांमध्ये दर्जेदार शिक्षक, डिजिटल सुविधा, प्रयोगशाळा आणि स्थानिक गरजांशी जोडलेले अभ्यासक्रम आवश्यक आहेत. देशातील जो नहीरेवाला वर्ग आहे त्याच्यासाठी जीवन विषयक अभ्यासक्रमाची निर्मिती आवश्यक आहे.मातृभाषेतील भक्कम प्राथमिक शिक्षण, संशोधन सांगते की मुलांचा बौद्धिक विकास मातृभाषेत अधिक चांगला होतो. इंग्रजीचे ज्ञान महत्त्वाचे आहे, पण मातृभाषेचा पाया मजबूत असणे तितकेच आवश्यक आहे.कौशल्याधारित शिक्षणात प्रत्येक विद्यार्थी डॉक्टर किंवा इंजिनिअर होणार नाही. मात्र शेती, उद्योग, तंत्रज्ञान, कारागिरी, सेवा, उद्योजकता, पर्यावरण, स्थानिक व्यवसाय यांच्याशी निगडित शिक्षणाची गरज आहे. त्यासाठी स्पर्धा परीक्षा-केंद्रित मानसिकता कमी करणे रोजगारनिर्मिती आणि विविध क्षेत्रांतील संधी वाढवणे अत्यावश्यक आहे.ग्रामीण भागासाठी विशेष शिक्षण धोरण , दुर्गम भागातील लहान शाळा टिकवण्यासाठी स्वतंत्र निधी आणि विशेष धोरण आवश्यक आहे. शिक्षणाने केवळ नोकरी नाही तर विचारशक्ती, संवेदनशीलता, आत्मविश्वास आणि समाजाशी नाते निर्माण व्हायला हवे. आज शिक्षण व्यवस्था मोठ्या प्रमाणावर प्रमाणपत्रे तयार करते; परंतु सक्षम आणि समाधानी नागरिक निर्माण करण्यात कमी पडते आहे. धोरणकर्ते, शिक्षणतज्ज्ञ आणि समाज यांनी एकत्र येऊन शिक्षणाचा मूलभूत अर्थ नव्याने समजून घेतला नाही, तर अनेक पिढ्या दिशाहीन होण्याचा धोका आहे. प्रकाशन करते.

पान १ वरुन

## पिंपळनेर येथील वीज उपकेंद्राचे भूमिपूजन

उपकेंद्राचे आज भूमिपूजन झाले.शेतकरी,व्यापारी व नागरिकांना या उपकेंद्राची मोठी आवश्यकता होती.जून २०२१ मध्ये या उपकेंद्राला मंजुरी मिळाली.मात्र आज पर्यंत या कामाला सुरुवात झाली नव्हती.आज सुकापुर शिवारात पाच एकर जागा उपलब्ध करून देण्यात आली. १०५ एकर आदिवासींच्या जमिनीतील ही पाच एकर जागा देण्यात आली होती. या जागेवर भूमिपूजन करण्यात आले.वीज उपकेंद्र लवकर सुरू होणार यासाठी आम्ही किती पाठपुरावा केला याची माहिती लोकांना सांगण्यात आली.या कार्यक्रमा नंतर मात्र ईदगाह पाडा येथील आदिवासींनी आमच्या जागेवर तुम्ही कसे भूमिपूजन केले ?असा प्रश्न उपस्थित केला.विशेष म्हणजे नागरीकांच्या विजेच्या प्रश्नाची गरज २०२१ पासून रेंगाळत असताना लोकप्रतिनिधी काय करत होते? असा सवाल जनतेमधून केला जात आहे.आता या जागेच्या प्रश्नामुळे अजून किती काळ या वीज उपकेंद्राचे काम लांबते हे बघावे लागणार आहे.

## कापूस लागवडीच्या कामांना वेग आला

मिळणे अपेक्षित आहे. मात्र, या आठ तासांतही अनेक वेळा तांत्रिक आणीबाणी पुढे करून वीज खंडित केली जाते. परिणामी, शेतकऱ्यांना दिवसभरात जेमतेम दोन ते तीन तासच वीज मिळत असल्याने शेतकरी पुरते हवालदिल झाले आहेत. सध्या कापसाची लागवड सुरू असून, लागवडीनंतर पिकाला लगेच पाणी देणे अत्यंत गरजेचे असते. अशा महत्त्वाच्या वेळेतच महावितरणचा हा विजेचा लपंडाव शेतकऱ्यांच्या मुळावर उठला आहे.या संपूर्ण प्रकारात देवभाने फीडर अंतर्गत येणाऱ्या शेतकऱ्यांना सर्वाधिक त्रासाला सामोरे जावे लागत आहे. सध्या या फीडरला रात्री ९ ते पहाटे ५ अशी रात्रीची वेळ देण्यात आली आहे. या वेळेत वीज सुरू झालीच, तर अवघ्या अर्ध्या-पाऊण तासात ती पुन्हा बंद होते. याबाबत उपकेंद्रातील कर्मचाऱ्यांना विचारणा केली असता, आमच्या ग्रुपवर भारनियमनाचा मेसेज आल्यामुळे आम्ही वीज पुरवठा खंडित करतो,असे हतबलतेचे उत्तर त्यांच्याकडून दिले जाते.शेतकऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, मागील आठवड्यात जेव्हा दिवसा वीज देण्याचे वेळापत्रक होते, तेव्हा आठवडाभरातील पाच दिवस सदर फीडर तांत्रिक बिघाडामुळे (फॉल्टी) बंदच होते. संपूर्ण आठवड्यात केवळ दोनच दिवस काही तासांसाठी वीज पुरवठा होऊ शकला. या सततच्या त्रासाला कंटाळून देवभाने फीडरवरील संतप्त शेतकऱ्यांनी मंगळवारी रात्री थेट सोनगीर विद्युत उपकेंद्र गाठून कर्मचाऱ्यांना जाब विचारला. मात्र, वरिष्ठांच्या आदेशापुढे आमचा नाईलाज आहे, असे सांगून कर्मचाऱ्यांनी हात झटकले. कापसाचे पीक धोक्यात येण्याची भीती निर्माण झाल्यामुळे, आता तरी महावितरणच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या गंभीर समस्येकडे तातडीने लक्ष देऊन वीज पुरवठा सुळीत करावा, अशी तीव्र मागणी परिसरातील मनोहर माळी, दीपक धनगर,जगदीश गुजर, राकेश माळी,हेमंत माळी, नंदलाल माळी,पंकज पाटील, योगेश पाटील,सोनू गुजर भैय्या पाटील,विनोद पाटील,सुनील माळी,लोटन सोनवणे,चेतन सोनवणे, पंडित माळी या शेतकऱ्यांनी केली आहे.

## श्रीराम व शेवंताई नगरात पाणीटंचाई

अनेकदा तक्रारी केल्या, मात्र त्यांना केवळ आश्वासने मिळाली असून प्रत्यक्ष कोणतीही कारवाई झालेली नाही.विशेष म्हणजे, सोनगीरजवळील जामफळ धरणात सध्या मुबलक पाणीसाठा उपलब्ध आहे. निसर्गाने पुरेसे पाणी दिले असूनही, केवळ ग्रामपंचायतीचे नियोजन नसल्यामुळे नागरिकांवर ही कृत्रिम जलटंचाई सोसण्याची वेळ आली असल्याचा आरोप होत आहे.या समस्येबाबत वसाहतीतील नागरिक कैलास पाटील, संदीप माळी, विजय पाटील, रामचंद्र पाटील, रवींद्र बडगुजर, सुनील भदाणे, प्रकाश महाजन आदींनी सरपंच, ग्रामसेवक आणि सदस्यांची प्रत्यक्ष भेट घेऊन वारंवार विनंती केली. मात्र, प्रशासन याकडे गांभीर्याने पाहत नसल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

## मनपा हद्दवाढीतील प्रॉपर्टी कार्ड मिळणार

पत्रिका देण्याचा शासन निर्णय झाल्याची माहिती आमदार राम भदाणे यांनी दिली. आमदार भदाणे यांनी सांगितले, सात मे ला मुंबईत महसुल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या दालनात त्यांच्या आदेशानुसार विशेष बैठक झाली होती. या बैठकीस आपण स्वतः, भाजपा जिल्हाध्यक्ष बापू खलाणे, मंत्रालयीन अधिकारी उपस्थित होते. तर धुळ्याच्या जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते, प्रांताधिकारी रोहन कुवर, विविध अधिकारी ऑनलाईन उपस्थित होते.

## धुळ्यातील तरुणाचा गोव्यात बुडून मृत्यू

त्यावेळी पोहण्यासाठी उतरल्यानंतर योगेश स्विमिंग टँक मधील पाण्यात बुडाला. याबाबत माहिती मिळताच धुळ्यातील चौधरी कुटुंबीयांना मोठा धक्का बसला. योगेशच्या मृत्यूने परिसरात हरहर व्यक्त होत आहे. त्याच्यामागे आई, वडील, पतकी व दोन मुले असा परिवार आहे.

पान १ वरुन

## गुलमर्ग मध्ये हवेत लटकले केबल कारचे पाळणे

मिळविले. दरम्यान, या घटनेची चौकशी करण्यात येणार आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, सोमवारी दुपारी गुलमर्ग गोंडोलाच्या बेस स्टेशन ते फेज (कोंगडोरी) दरम्यान अचानक तांत्रिक बिघाड झाला. या बिघाडामुळे धावती केबल कार सिस्टीम एकाएकी जागेवरच थांबली. ज्यावेळी हा बिघाड झाला त्यावेळी बासष्ट केबिन (पाळणे) वेगवेगळ्या उंचीवर हवेत थांबल्या. तर तीन केबिन रोटेशनमध्ये नव्हत्या. बावन्न केबिन प्रवाशांनी पूर्ण भरलेल्या होत्या. उंचावर अडकलेले पर्यटक भीतीने मदतीसाठी आरडाओरडा करू लागले होते.

### कौतुक आणि चौकशीचे आदेश

जम्मू-काश्मीरचे मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला आणि उपराज्यपाल मनोज सिन्हा यांनी या संपूर्ण परिस्थितीवर बारीक लक्ष ठेवून होते. मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांनी भारतीय लष्कर, पोलीस, एसडीआरएफ आणि स्थानिक नागरिकांच्या तत्परतेचे व व्यावसायिकतेचे जाहीर कौतुक केले आहे. पर्यटकांच्या सुरक्षेशी तडजोड खपवून घेतली जाणार नाही, असे सांगत मुख्यमंत्र्यांनी या संपूर्ण तांत्रिक बिघाडाची उच्चस्तरीय चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत. तांत्रिक तज्ज्ञांच्या तपासणीनंतरच ही सेवा पुन्हा सुरू केली जाईल, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

## एबी फाऊंडेशनतर्फे मोफत शस्त्रक्रीया

न बसणाऱ्या आजारांच्या गरजू रुग्णांवर मोफत शस्त्रक्रिया करण्यात येणार आहेत. एबी फाउंडेशनच्या मोफत शस्त्रक्रिया अभियानांतर्गत हर्निया, मूळव्याध-भगंदर, अंडाशयाच्या गाठी, पेंडिक्स, थॉयराइड, पित्ताशय, गर्भपिशवी, पोटाच्या गाठी, हायड्रोसिल, गर्भपिशवी साफ करणे, शरीरावरील गाठी आदी शस्त्रक्रिया करण्यात येणार आहेत. आवश्यकतेनुसार महिला-पुरुष रुग्णांवर धुळे शहरासह नाशिक, पुणे, मुंबई आदी ठिकाणच्या रुग्णालयांत या सर्व शस्त्रक्रिया मोफत करण्यात येतील. या संधीचा गरजू रुग्णांनी आवर्जून लाभ घ्यावा, असे आवाहनही आमदार अग्रवाल यांनी केले आहे. एबी फाउंडेशनतर्फे १५ जूनपर्यंत चालणाऱ्या या मोफत शस्त्रक्रिया अभियानाचा लाभ घेण्यासाठी गरजू रुग्णांनी एबी फाउंडेशनच्या कार्यालयात (डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन शॉपिंग कॉम्प्लेक्स, जुन्या महापालिकेच्या मागील बाजूस, राजवाडे बँकेसमोर, धुळे) अथवा फाउंडेशनचे आरोग्यदूत कमलेश देवरे (८०५५५५६९९०) यांच्याशी संपर्क साधावा.

## सरवड फाट्यावर गोवंशाची ॲम्ब्युलन्स पकडली

सोनगीर टोल नाक्याजवळ कर्तव्यावर असलेले पो. कॉ. यशवंत महाले आणि चालक पो. हे. कॉ. युसुफ शेख यांनी सतर्कता बाळगत पाळत ठेवली. दरम्यान, शिरपूरकडून धुळ्याच्या दिशेने एक विना नंबरची टाटा कंपनीची ॲम्बुलन्स अतिशय वेगाने जाताना दिसली. गोरक्षकांनी दिलेल्या माहितीनुसार ही तीच संशयित गाडी असल्याचे स्पष्ट होताच पोलिसांनी आणि कारवाईत सहभागी असलेल्या गोरक्षकांनी तातडीने या गाडीचा पाठलाग सुरू केला. पोलिसांनी वेगवान पाठलाग करून सरवड गावच्या फाट्याजवळ या संशयित ॲम्बुलन्सला गाठले. मात्र, पोलिसांची गाडी पाठीमागे असल्याचे पाहताच अज्ञात चालक ॲम्बुलन्स रस्त्यावरच सोडून पळून गेला. संशय बळावल्याने पोलिसांनी आणि गोरक्षकांनी गाडीचे मागील दार उघडून झडती घेतली असता, आतमध्ये रुग्ण किंवा वैद्यकीय साहित्याऐवीजी गोवंश जातीची जनावरे अतिशय निर्दयतेने, दाटीवाटीने आणि आखूड दोरीने बांधलेल्या अवस्थेत आढळून आली. कत्तलीच्या उद्देशानेच या जनावरांची बेकायदेशीर वाहतूक केली जात होती. या कारवाईत ॲम्बुलन्ससह सुमारे पावणे दोन लाखाचा ऐवज जप्त करण्यात आला आहे.या प्रकरणी पो. कॉ. यशवंत देविदास महाले यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चालकाविरुद्ध विविध कलमान्वये सोनगीर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास सोनगीर पोलीस करत आहेत.

## नीट परीक्षा प्रकरणी कारवाई करा- भाकप

पुण्यातील आरोपी प्रा.मनिषा मांढरे, लातूर आरसीसी क्लासचे शिवराज मोटेगावकर, प्रा.सी.व्ही.कुलकर्णी यांना अटक करण्यात आली आहे. नीट पेपर फुटी प्रकरणाची सखोल व निष्पक्ष चौकशी करण्यात यावी. संबंधित क्लास चालक, प्राध्यापक, दलाल व दोषींवर कठोर शिक्षा व्हावी. विद्यार्थ्यांची फसवणूक करणाऱ्या कोचिंग क्लासचे परवाने रद्द करण्यात यावे. भविष्यात अशा घटनेची पुनरावृत्ती होणार नाही यासाठी परीक्षा व्यवस्थेत पारदर्शकता व कडक सुरक्षा उपाययोजना करण्यात याव्यात. विद्यार्थ्यांना न्याय मिळावा यासाठी ठोस भूमिका घ्यावी. एनटीए ही संस्था रद्द करावी. घटनेची तीव्रता पाहता केंद्रीय शिक्षण मंत्र्यांनी राजीनामा द्यावा. शासनाने तात्काळ कठोर पावले उचलावी. अशी मागणी भाकपाचे कॉ.एल.आर.राव, कॉ.राजेंद्र चौरे, कॉ. आसीफ शेख, कॉ.शंकर जाधव, कॉ.पोपटराव चौधरी, साथी हरीश्चंद्र लोंढे, बबन वानखेडे, श्रीकृष्ण बेडसे, चेतन मिस्तरी, वेल्फेअर पार्टी ऑफ इंडियाचे जिल्हाध्यक्ष मोहम्मद जैद, पंडीत गोसावी यांनी केली.



प्रशांत जानी महाराज

## जप होत नसेल तर नामस्मरण करा


नंदुरबार,दि.२५ (प्रतिनिधी)- मोबाईल इंटरनेटच्या कलियुगात जप तप ध्यानस्मरण होत नसेल तर भागवत नाम स्मरण करा, भजन, कीर्तन करून पुण्य कमवा. लग्न समारंभांमध्ये होणारा अवाजवी खर्च टाळून श्रीमद भागवतच्या माध्यमातून धर्मकार्य वाढवा.पुरुषोत्तम मास निमित्त भगवंताचे नामस्मरणाची संधी चुकवू नका असे आवाहन भागवताचार्य, संस्कृत विशारद प्रशांत जानी महाराज यांनी केले.

नंदुरबार येथील श्री समस्त पंच खडायता विसा समाजातर्फे पवित्र पुरुषोत्तम अधिक मास निमित्त श्रीमद् भागवत ज्ञानयज्ञ सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. रविवारी सकाळी द्वारकाधीश मंदिर येथून ग्रंथ शोभायात्रा काढण्यात आली. अहिल्याबाई विहीर, सोनार खुंट, मार्गे शोभायात्रा गुळवाडी येथे पोहोचली. रविवार पासून सुरू झालेली श्रीमद् भागवत कथा दररोज दुपारी चार ते सात या वेळेत बाबुभाई चक्कीवाला गुळवाडी येथे सुरू आहे. कथेचे निरूपण प्रशांत जानी महाराज करीत आहेत. यावेळी पुढे बोलताना प्रशांत जानी महाराज म्हणाले की, जिभेवर नियंत्रण ठेवा म्हणजे आयुष्यात यश प्राप्त होते. श्रीमद् भागवत सप्ताह पारायणाचे महत्त्व पुरुषोत्तम मासात अलौकिक आहे, माझे घर, माझी संपत्ती यातच मानवाचे जीवन अडकले असून भगवंताच्या नामस्मरणासाठी वेळ काढणे गरजेचे आहे.

## त्रिविक्रम मंदिर संस्थान आरोग्य तपासणी शिबीर

धुळे, दि.२६- शहरातील ग.नं.२ मधील श्री त्रिविक्रम मंदिर संस्थानतर्फे मोफत आरोग्य तपासणी व मार्गदर्शन शिबीराचे आयोजन दि.१ जून २०२६ रोजी देवपूर विद्यानगरी, दत्तमंदिर चौक, महाजन हायस्कूल जवळ देवरे ॲक्सीडेंट हॉस्पिटल येथे सकाळी ८ ते १ यावेळेत होणार आहे. यासाठी नाव नोंदणी आवश्यक आहे. या शिबीरात सीबीसी, आरएफटी, एलएफटी, टीएफटी, लिपीड प्रोफाईल, आरए फॅक्टर, युरिक ॲसिड, रक्तदाब, गरजुंसाठी ईसीजी, बीएमडी, मज्जा तंतूची चाचणी, ही चाचणी डायबीटीस, बी.पी.पेशंटसाठी फक्त. डॉ. रोहन कुलकर्णी रूग्णांची तपासणी करणार आहेत. रक्त तपासण्यांचे रिपोर्ट तीन ते चार दिवसानंतर येतील. नाव नोंदणीसाठी एन.एम. जोशी, शशि जोशी, चंद्रशेखर पुरोहित, चंद्रशेखर कुलकर्णी, गिरीश कुलकर्णी यांच्याकडे करावी. शिबीराचा लाभ घेण्याचे आवाहन संस्थेचे अध्यक्ष प्रा.देवेंद्र डोंगरे, सचिव चंद्रशेखर नाईक यांनी केले आहे.

## प्रकाश में आज
## सनी




धर्मेंद्र, वहीदा रेहमान, शर्मीला टायोर, सनी देओल, अमृतासिंग

## शब्दकोडे क्रमांक : २३७५

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | २ | ■ | ३ | | ■ | ४ | ■ | ५ | | ६ |
| | ■ | ७ | | | ■ | ८ | | ९ | | ■ | |
| १० | ११ | | ■ | १२ | | | | | ■ | १३ | |
| १४ | | ■ | १५ | | ■ | | ■ | १६ | १७ | | ■ |
| ■ | १८ | १९ | | ■ | २० | ■ | २१ | | | ■ | २२ |
| २३ | ■ | २४ | | २५ | ■ | २६ | | ■ | २७ | २८ | |
| २९ | ३० | | ■ | ३१ | ३२ | | ■ | ३३ | ■ | ३४ | |
| ३५ | | ■ | ३६ | | | ■ | ३७ | | ३८ | | ■ |
| ■ | ३९ | ४० | | | | ४१ | ■ | ४२ | | ■ | ४३ |
| ४४ | ■ | ४५ | | ■ | ४६ | | ४७ | ■ | ४८ | ४९ | |
| ५० | ५१ | | ■ | ५२ | | | | ५३ | ■ | ५४ | |
| ५५ | | | | ■ | | ■ | ५६ | | | ■ | |

**आडवे शब्द :** १. ज्याचा अंत नाही असा ३.भांडणाचा मुद्दा ५.सुसर,एक उभयचर प्राणी ७.बाधा ८.जादूटोणाचा एक प्रकार १०.मनुष्य १२.धोकादायक १३.विविध प्रकारचा १४.विषम-विरुद्ध १५.धारदार शस्त्राचे वण १६.मनोहर १८.शहर २०.गाईच्या दुधापासून बनवतात २१. आदरासह २४.मसाविचा जोडीदार २६.पाण्याचे डबके २७.एक उभयचर पक्षी २९.उचलण्यास सोपा ३१.शोध ३४.दुर्ग ३५.वस्तू मोजण्याचे एकक ३६.एक ऋषी ३७.वायफळ बोलणे ३९.रायगडावरील एक टोक ४२.मनाचा ओढा ४५.वाणी ४६.एक ऋतू ४८.अंदाज ५०.लकब ५२. पुण्यातील एक प्रसिद्ध बाग ५४.पाकळी ५५.हिंदीत-भांडे ५६.घुसळून केलेली डाळ

**उभे शब्द :** १.अंदाज २.एक नैसर्गिक जलाशय ३.मजबूत मनःस्थितीचा ४.इंग्रजीत-केळे ५. बुद्धी ६.जीवा ८.आपला देश ९.मध ११. वंदन १३.श्वास घेण्याचे इंद्रिय १५.वसा १७.दरारा १९.गोंधळ २१.हाक २२.वानर २३.श्रीकृष्णाचे एक नाव २५.वितरण करणारा २६.मनातील इच्छा २८.कंकड ३०. एखादयाशी असलेली घसट ३२.पाकिस्तानचे संक्षिप्त रूप ३३.रस्ता ३६.लहान डाव ३८.अंड्यातील पिवळा भाग ४०.कसरत ४१. मुख्य गायकासोबत गाणारा समूह गायकाचा ताफा ४३.चर्चा ४४.परीक्षा ४६.लज्जा ४७.दाब ४९.हिंदीत-आठवण ५१.आशीर्वाद ५३.फळातील मगज

### शब्दकोडे क्रमांक : २३७४ चे उत्तर

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| प्रे | र | णा | ■ | प | र्य | ट | न | ■ | मा | न | स |
| म | त | ■ | दू | र | ■ | च | ■ | क | ल | म | ■ |
| ■ | न | ई | ■ | त | व | ■ | चा | ल | क | ■ | क |
| बा | ■ | म | नी | ■ | का | प | ■ | प | ■ | वा | र |
| ब | ब | ली | ■ | अ | ल | ग | द | ■ | पा | ल | क |
| ■ | ल | ■ | पं | ग | त | ■ | बा | व | टा | ■ | री |
| पा | ■ | नी | ■ | र | ■ | स | व | त | ■ | ला | त |
| पा | वा | ■ | अ | ब | त | क | ■ | न | क | ल | ■ |
| ■ | चा | य | प | त्ती | ■ | ल | त | ■ | पा | च | क |
| सा | ■ | म | ना | ■ | पा | ■ | प | री | ट | ■ | रं |
| क | मा | न | ■ | का | र | क | ■ | घ | ■ | बा | ग |
| व | न | ■ | वा | टा | ■ | प | थ | ■ | पा | क | ळी |






## पान १ वरुन

### कांदा उत्पादकांच्या परिस्थितीला सरकार जबाबदार

यावेळी बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ पुढे म्हणाले की, महागाईने शेतकऱ्यांना जगणे, शेती करणे कठीण झाले आहे, शेतमालाला हमीभाव मिळत नाही. कांद्याचे भाव पडलेले आहेत, त्यामुळे शेतकरी हवालदिल झाला आहे पण सरकार मात्र झोपेतून जागे होत नाही. कांद्याची शासकीय खरेदी करण्याची घोषणा केली पण अद्याप कांदा खरेदी सुरु झालेली नाही. कांद्याची खरेदी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या माध्यमातूनच झाली पाहिजे. कांदा खरेदीत व्यापाऱ्यांचे भले करु नका, शेतकऱ्यांना भाव मिळाला पाहिजे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे खोटारडे आहेत. त्यांनी आजपर्यंत केलेल्या घोषणा कधीच पूर्ण केलेल्या नाहीत.यापूर्वी फडणवीस यांनी २०२३ मध्ये प्रती क्विंटल २४०० रुपये दर देणार असे सांगितले होते. प्रत्यक्ष भाव देण्याची वेळ आली तेव्हा १२०० रुपये देत आहेत. आज आंदोलनानंतर केंद्र सरकारच्या हवाल्याने १५०० रुपये दर जाहिर करण्यात आला. परंतु हा दर केवळ आंदोलन करणाऱ्या नाशिक जिल्ह्यातील कांदा उत्पादकांसाठी आहे. राज्यातील अन्य कांदा उत्पादक शेतकऱ्यांचे काय असा प्रश्न काँग्रेस अध्यक्ष सपकाळ यांनी उपस्थित केला. काँग्रेस पक्ष व संपूर्ण महाविकास आघाडी शेतकऱ्यांबरोबर असून कांदा उत्पादक शेतकऱ्यांना हमीभाव मिळाल्याशिवाय आम्ही गप्प बसणार नाही, असेही हर्षवर्धन सपकाळ म्हणाले.

#### सरकारकडून उत्पादकांची दिशाभूल

दरम्यान या आंदोलनावेळी बोलताना उबाठाचे अंबादास दानवे म्हणाले की, शेतकऱ्यांना कांद्याला भाव मिळाला पाहिजे ही आमची मागणी आहे. त्यासाठी आम्ही शेतकऱ्यांसह आंदोलन करत आहोत. सरकारला भाव काहीही जाहीर करू द्या, पण खरेदी काही झालेली नाही. केवळ घोषणेला काही अर्थ नाही. सरकारने एखाद्या शेतकऱ्याला समाधानकारक भाव दिल्याची पावती दाखवावी. सरकारकडून कांदा उत्पादक शेतकरी आणि जनतेची दिशाभूल करण्यात येत आहे.

#### किमान चोवीस रुपये भाव द्यावा

राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार रोहित पवार म्हणाले की, आजच्या मोर्चाचे नेतृत्व हे सामान्य शेतकरी करत आहेत. आम्ही केवळ शेतकऱ्यांच्या मोर्चामध्ये उपस्थित आहोत. आमच्या सर्वच पदाधिकाऱ्यांनी यासाठी प्रयत्न केले आहेत. यापुर्वी २०२३ मध्ये देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले होते की, कांद्याला चोवीस रूपये किलो भाव देऊ. आता निवडणूक झाल्यावर तुम्ही बारा रुपयांवर भाव देऊ म्हणतात. मग आम्ही आंदोलन केल्यावर साडेपंधरा रुपये दर जाहीर केला. पण यानेही काही फरक पडणार नाही. त्यामुळे दर वाढवण्यात यावा अशी आमची मागणी आहे. नाफेडने खरेदी वाढवली पाहिजे. नाफेडने कांदा भारताबाहेर विकला पाहिजे. ज्या शेतकऱ्यांनी आतापर्यंत कांदा दिला त्यांना किलो मागे दहा रुपये अनुदान दिले पाहिजे. शेतकऱ्यांचा निम्मा खर्च सुद्धा आता निघत नाही. अवकाळी पाऊस, गारपीट यामुळे शेतकऱ्यांना अठरा ते एकोणावीस रुपये किलो उत्पादन खर्च आहे. त्यामुळे कांद्याला किमान चोवीस रूपये किलो तरी भाव द्यावा. शेतकऱ्यांनी जगावे कसे? असा प्रश्न रोहित पवार यांनी यावेळी उपस्थित केला.

#### सत्ताधाऱ्यांचे लक्ष विधान परिषदेकडे

आमदार रोहित पवार म्हणाले की, शेतकरी मरतोय आणि सत्ताधारी पक्षाचे नेते विधान परिषदेची कोणती जागा कोणाला सोडायची, यावर चर्चा करत आहेत. सत्तेतील नेते विधान परिषदेच्या मागे लागले आहेत. शेतकरी जगावा यासाठी जी मदत करावी लागेल ती केली पाहिजे. शेतकरी सर्वच बाजूने संकटात सापडला आहे. शेतकऱ्यांच्या बाजूने कोणीतरी उभे राहिले पाहिजे, असे रोहित पवार यांनी म्हटले आहे.

#### इंधन दरवाढी विरोधात एनसीपी आक्रमक

दुसरीकडे नागपुरात इंधन दरवाढी विरोधात पवारांची राष्ट्रवादी काँग्रेस आक्रमक झाली आहे. त्यांनी त्याविरोधात आंदोलन सुरू केले आहे. यावेळी बोलताना अनिल देशमुख म्हणाले की, देशात महागाई वाढली आहे. याकडे ना राज्य सरकारचे लक्ष आहे ना केंद्र सरकारचे. दोन्ही सरकारने एकत्रित निर्णय घेत पेट्रोलचे दर कमी करण्यासाठी निर्णय घेतला पाहिजे. सत्ताधाऱ्यांचे संपूर्ण लक्ष हे विधान परिषदेच्या निवडणुकीकडे आहे. जनतेला होणाऱ्या त्रासाकडे बघायला त्यांना वेळ नाही. पेट्रोल-डिझेलच्या किंमती कमी झाल्या पाहिजेत यासाठी आम्ही हे आंदोलन करत आहोत, असे अनिल देशमुख यांनी सांगितले.

### दिडशे कोटींचे कर्ज घेण्यास महासभेने दिली मंजुरी

हप्ते सुरू होणार आहेत. वीस वर्षांची परतफेड राहणार आहे. महापालिकेची झालेली हद्दवाढ, एलबीटी पोटी शासनाकडून मिळणारे अनुदान, व्यापारी संकुलांच्या माध्यमातून होणारी वसुली यामुळे कर्जाची रक्कम भरणे कठीण होणार नाही. यासाठी भाजप नेते शासनदरबारी पाठपुरावा करत असल्याचा सुर सत्ताधारी नगरसेवकांमधून उमटला. कर्ज काढल्याने महापालिकेवर कर्जाचा डोंगर उभा राहिल असा आरोप विरोधकांनी यावेळी केला. दरम्यान कर्जाचा डोंगर नव्हे तर विकासाचा डोंगर उभा राहणार असल्याचे सांगत ठरावाच्या बाजुने सकारात्मकता दर्शविली.

#### विरोधी नगरसेवकाचा सभात्याग

राष्ट्रवादी काँग्रेसचे नगरसेवक शाहबाज शाह यांनी महापालिकेच्या १४९.७७ कोटींचे कर्ज घेण्याच्या विषयाला तीव्र विरोध दर्शविला. भविष्यात काही कारणास्तव योजना रखडल्यास त्याचा धुळेकर जनतेला भुर्दंड बसेल. जनता आम्हाला माफ करणार नाही. विकास कामांना विरोध नाही, पण त्यात होणाऱ्या भ्रष्टाचाराला विरोध आहे. कर्ज एका विशिष्ट बँकेकडूनच का घेतल जातय ? असा परखड सवाल उपस्थित करत राष्ट्रवादी व शिवसेनेचे नगरसेवक सभागृहातून बाहेर पडले.

#### कर्जाबाबत केंद्र शासनाची हमी

आयुक्त नितीन कापडणीस यांनी मनिस्सारण योजनेबाबत महासभेत सविस्तर माहिती देवून शहराच्या विकासासाठी आवश्यक असल्याचे नमुद केले. शहरातील नागरिकांवर कोणताही अतिरिक्त भार न टाकता जीएसटी अनुदानासह नवीन व्यापारी संकुलांच्या माध्यमातून उपलब्ध होणाऱ्या उत्पन्नातून वीस वर्षांत कर्जाची परतफेड करता येणार आहे. केंद्र सरकारने देखील त्याची हमी घेतली असल्याने कर्ज घेण्यास हरकत नसावी असे मत व्यक्त केले.

### कांदा पंधरा रूपये किलो मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

सुरू असलेल्या आंदोलनावर बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, कालच केंद्र सरकारने कांदे खरेदीचा भाव साडेतीन रुपयांनी वाढवून जवळपास पंधरा रुपयांपर्यंत नेलेला आहे. कांद्याची मोठ्या प्रमाणावर खरेदी देखील सुरू केलेली आहे. आम्ही केंद्र सरकारला या संदर्भात बैठक घेण्याची विनंती केली होती. उद्या संध्याकाळी त्या संदर्भात बैठक होणार आहे. कांद्याच्या संदर्भात राज्य आणि केंद्र सरकार चर्चा करत आहे. पंधरा रुपयांची खरेदी आपण सुरू केलेली आहे. शेतकऱ्यांच्या संदर्भात राज्यातील सरकार संवेदनशील आहे. पण काही लोक विनाकारण याबाबत राजकारण करू इच्छितात. त्यांना माझे सांगणे आहे की, राज्य आणि केंद्र सरकारने पंधरा रुपयांनी कांदा खरेदीचा निर्णय केला आहे. तुमच्या काळात कधी असा निर्णय केला होता का ते दाखवा. तो कधीच दिसणार नाही. आम्ही संवेदनशील आहोत म्हणूनच हे करत आहोत. आम्हाला याची कल्पना आहे की, इतके करून भागणार नाही, अनेक गोष्टी कराव्या लागतील. त्यामुळेच केंद्र सरकारसोबत उद्याला बैठक आम्ही घेत आहोत. त्या बैठकीतून दीर्घकालीन उपाययोजना काय करता येतील याचा प्रयत्न केला जाणार आहे. हे शंभर टक्के राजकीय आंदोलन आहे, असे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

### पालकमंत्री रावलांच्या सुचनेनुसार बुराईत पाणी सोडणार

प्रक्रिया तातडीने सुरू करावी. तसेच तहसीलदार, ग्रामपंचायत, पोलीस प्रशासन आणि पाटबंधारे विभाग यांनी समन्वय ठेवून पाणी गावांपर्यंत पोहोचविण्याच्या सूचना या आदेशात देण्यात आल्या आहेत. या निर्णयामुळे शिंदखेडा तालुक्यातील बुराई नदीकाठावरील अनेक गावांना मोठा दिलासा मिळणार असून ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले आहे.

## पान १ वरुन

### आई वडील ज्येष्ठ नागरिक संस्थेचे बेमुदत धरणे

ज्येष्ठ नागरिक समन्वय संनियंत्रण समितीच्या १० सप्टेंबर २०२४, २५जून २०२५ आणि १७ डिसेंबर २०२५ या तीनही बैठकांमध्ये सदर समाज मंदिर इमारत ज्येष्ठ नागरिकांच्या सामाजिक कार्यासाठी दुरूस्त करून हस्तांतरीत करण्याचे स्पष्ट लेखी व तोंडी निर्देश देण्यात आले होते.

हुडको सहकारी गृहनिर्माण संस्थेची संमती सामाजिक सभागृह हे आई वडील व ज्येष्ठ नागरिक कल्याण संस्था नंदुरबार या सेवाभावी संस्थेस अधिकृत शासकीय यंत्रणेकडून उपलब्ध करून देणेस गृहनिर्माण संस्थेची कोणतीही हरकत नसल्याचा ठराव दि.२७/०१/२०२४ करून दिलेला आहे.

#### ज्येष्ठ नागरिकांचे बेमुदत धरणे आंदोलन

७०-८० वर्षे वयाच्या वृद्ध नागरिकांनी २५ मे २०२६ पासून नगर परिषदेसमार बेमुदत धरणे आंदोलन सुरू केले आहे. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष बारकू यमुना नवल पाटील यांनी आरोप केला आहे. की मुख्याधिकाऱ्यांनी वस्तीतील काही लोकांना चिथावणी देवून हा वाद मुद्दाम निर्माण केला आहे. आणि वस्तीतील सलोखा बिघडवण्याचा प्रयत्न केला आहे. आंदोलनाची गंभीर दखल घेत नंदुरबार नगर परिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांनी पत्राद्वारे आंदोलन मागे घेण्याचे आवाहन करीत हुडको वस्तीतील संबंधित नागरिक आणि ज्येष्ठ नागरिक संस्थेचे प्रतिनिधी यांच्यात समन्वय घडवून आणण्यासाठी मुख्याधिकारी दालनात संयुक्त बैठक आयोजीत करण्यात आली आहे. दोन्ही बाजूंचे म्हणने ऐकुण घेवून योग्य तो कायदेशीर मार्ग काढण्यात येणार आहे.

आता या ३ जूनच्या संयुक्त बैठकीत जिल्हाधिकाऱ्यांच्या जुन्या आदेशांचा मान राखला जाणार का आणि ज्येष्ठ नागरिकांना त्यांचा हक्क मिळणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. आंदोलन यशस्वीतेसाठी संस्थेचे आत्माराम इंदवे, व्हि. आर. पाटील, देविदास व्हि. सुर्यवंशी, दिलीप के. साळुंखे, देविदास के. बच्छाव, देविदास डी. चौधरी, बी. के. पाटील, रामदास बी. पाटील, एन. बी. कुळकर्णी यांनी परिश्रम घेतले.

### उष्णतेचा कहर झाल्याने जळगावात चौघांचा मृत्यू

झाला आहे. जळगावातील चिंचोली येथील सत्तावन्न वर्षीय सेंट्रींग कामगार केशरलाल दौलत पाटील हे दुपारी उन्हात काम करत असताना अचानक चक्कर येऊन पडले. त्यांना तातडीने शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात दाखल करण्यात आले, मात्र डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. शासकीय रुग्णालयात त्यांच्या मृत्यूची नोंद उष्माघाताने झाल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. याव्यतिरिक्त जिल्ह्यातील इतर वेगवेगळ्या भागांत प्रवीण दत्तु मिस्तरी, श्रीकांत रमेश कोळी आणि नंदू किशोर पाटील या तीन तरुणांचा उलटी, चक्कर येणे यांसारख्या उष्माघातसदृष्य लक्षणांमुळे मृत्यू झाला आहे. अचानक तरुणांचे झालेले हे मृत्यू वातावरणातील वाढत्या उष्णतेचे गांभीर्य दाखवून देतात.

### सुट्टीतील जनगणनेचे काम अर्जित रजेत धरा

संख्या दहाच्या पुढे गेल्याची माहिती समोर आली आहे. या घटनांमुळे कर्मचारी वर्गामध्ये भीती, तणाव व असुरक्षिततेचे वातावरण निर्माण झाले असून शासनाने याची तातडीने दखल घेण्याची आवश्यकता असल्याचे महेश मुळे यांनी नमूद केले आहे.

निवेदनामध्ये जनगणना कार्यादरम्यान मृत्यू, अपंगत्व अथवा गंभीर दुखापतीच्या प्रसंगी कर्मचाऱ्यांना कोणतेही स्पष्ट विमा संरक्षण अथवा सानुग्रह अनुदान देण्याबाबत शासनाने अद्याप ठोस धोरण जाहीर केले नसल्याबद्दल चिंता व्यक्त करण्यात आली आहे. त्यामुळे जनगणना कार्यासाठी नियुक्त सर्व प्रगणक, पर्यवेक्षक तसेच प्रशिक्षण देणाऱ्या कर्मचाऱ्यांना कार्यकालावधीत किमान ५० लाख रुपयांचे विमा संरक्षण लागू करण्यात यावे व त्यासंदर्भातील स्पष्ट शासन निर्णय तात्काळ जारी करण्यात यावेत, अशी प्रमुख मागणी करण्यात आली आहे.

तसेच जनगणना कार्यादरम्यान मृत्यू, अपंगत्व किंवा गंभीर दुखापत झालेल्या कर्मचाऱ्यांना तत्काळ सानुग्रह अनुदान मंजूर करण्यासाठी स्वतंत्र धोरण जाहीर करावे आणि संबंधित कुटुंबियांना तातडीने आर्थिक सहाय्य उपलब्ध करून द्यावे, अशी मागणीही करण्यात आली आहे.

महेश मुळे यांनी जनगणना कर्मचाऱ्यांवर वाढणारा अतिरिक्त कामाचा ताणही निवेदनात अधोरेखित केला आहे. प्रत्येक प्रगणकास केवळ एकच घरदारी गट (एचबीएल) देण्यात यावा. ज्या कर्मचाऱ्यांना दोन एचबीएल गट देण्यात आले आहेत, त्यांना अतिरिक्त प्रगणक उपलब्ध करून द्यावेत अथवा त्यानुसार अतिरिक्त मानधन मंजूर करण्यात यावे, अशी मागणी त्यांनी केली आहे.

याशिवाय प्रगणक म्हणून नियुक्त करण्यात आलेल्या शिक्षकांना त्यांच्या मूळ शाळा अथवा स्थानिक कार्यक्षेत्रामध्येच नियुक्ती देण्यात यावी, जेणेकरून अनावश्यक प्रवास, मानसिक ताण तसेच प्रशासकीय अडचणी टाळता येतील, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. निवडणूक कार्याप्रमाणेच जनगणना कार्यासाठी आवश्यक सर्व साहित्य शासनामार्फत उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली असून प्रत्येक प्रगणकास कार्यासाठी आवश्यक स्मार्टफोन किंवा मोबाईल तात्पुरत्या स्वरूपात उपलब्ध करून द्यावा, अशी मागणीही करण्यात आली आहे. अनेक कर्मचाऱ्यांकडे अद्ययावत साधने नसल्यामुळे प्रत्यक्ष काम करताना अडचणी येत असल्याचे निवेदनात म्हटले आहे. उन्हाळ्याची तीव्रता लक्षात घेऊन जनगणना कर्मचाऱ्यांसाठी पिण्याचे स्वच्छ पाणी, प्राथमिक आरोग्य सुविधा, विश्रांती व्यवस्था तसेच आवश्यक सुरक्षा उपाययोजना उपलब्ध करून देण्याची मागणीही यावेळी करण्यात आली आहे. जनगणना हे राष्ट्रहिताचे अत्यंत महत्त्वपूर्ण कार्य असून, या कार्यात योगदान देणाऱ्या कर्मचाऱ्यांची सुरक्षितता, सन्मान व हित जपणे ही शासनाची नैतिक तसेच प्रशासकीय जबाबदारी असल्याचे महेश मुळे यांनी स्पष्ट केले. शासनाने या सर्व मागण्यांबाबत तातडीने सकारात्मक निर्णय घेऊन आवश्यक आदेश जारी करावेत, अशी मागणी भाजपा शिक्षक आघाडीचे नाशिक विभाग संयोजक महेश मुळे, प्रदेश सदस्य डॉ. नितीन कापडीस, धुळे महानगर संयोजक मनोहर चौधरी यांच्यासह अविनाश पाटील, जितेंद्र कागणे, रोहिणी मुळे, अपर्णा पाटील, आनंद पाटील, संदीप सोनवणे, योगेश देवरे, देवेंद्र गिरासे, कमलेश भदाणे, प्रवीण बाविस्कर, अमोल शिंदे, विनोद जैन, इंद्रजित जमादार, कैलास अमृतकर, संजय वाघ, भूपेंद्र मालपुरे आदी पदाधिकाऱ्यांनी केली आहे.

### नंदुरबार वैद्यकीय महाविद्यालयाच्या कामांना गती द्या

करण्यासाठी जिल्हाधिकारी, अधिष्ठाता आणि संबंधित विभागांनी विशेष लक्ष द्यावे. प्रलंबित कामे तातडीने मार्गी लावून नागरिकांना लवकरात लवकर आरोग्य सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, असे निर्देशही त्यांनी दिले. कामांच्या गुणवत्तेबाबत कोणतीही तडजोड होऊ देऊ नये, निधी वितरण व प्रशासकीय मंजुरीची प्रक्रिया गतिमान करावी, असे सांगतानाच अलिबाग, वाशिम, अमरावती, गडचिरोली, धाराशिव, रत्नागिरी, पालघर आणि अंबरनाथ येथील वैद्यकीय महाविद्यालयांच्या कामांचाही बैठकीत आढावा घेण्यात आल्याची माहिती मंत्री मुश्रीफ यांनी दिली.

### चांदगडला तीन मुलींचा शेततळ्यात बुडून मृत्यू

गावाजवळील शेततळ्याजवळ गेल्या असता हा दुर्दैवी प्रकार घडला. घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी तातडीने मदतकार्य सुरू केले. मात्र, तिघींनाही बाहेर काढेपर्यंत उशीर झाला होता. मृत मुलींमध्ये धनुष्का पांडुरंग सांबरेकर, रिया चंद्रकांत सांबरेकर आणि स्वरा जयंत नाईक यांचा समावेश आहे. धनुष्का आणि रिया या दोघी मूळच्या आंबेवाडी (ता. बेळगाव) येथील असून सध्या गोव्यातील पर्वरी येथे वास्तव्यास होत्या. तर स्वरा ही मूळची होसूर (ता. चंदगड) येथील असून सध्या उचगाव (ता. करवीर) येथे राहत होती.

## धुळे शहरात गो तस्करीच्या वादातून परस्परविरोधी गुन्हे

**धुळे, दि.२६ - गोवंश तस्करीच्या संशयातून दोन तरुणांना मारहाणीची घटना शहरात स्टेशनरोड परिसरात घडली. याप्रकरणी शहर पोलीस ठाण्यात परस्परविरोधी दहा जणांविरोधात मारहाणीसह गोवंश तस्करी कायद्यान्वये गुन्हा दाखल झाला.**

कत्तलीच्या उद्देशाने जनावरांची निर्दयीपणे वाहतूक होत असल्याची माहिती मिळाली, त्यावरून काही तरुणांनी काल दुपारी शहरातील रेल्वे स्टेशन परिसरात (एमएच ०८ /एइ८३७३) या क्रमांकाच्या स्विफ्ट डिझायर कार अडवत तरुणांनी झडती घेतली. यावेळी वाहनात दोन गायी दाटीवाटीने बांधलेल्या अवस्थेत मिळाले. त्यावरून जमावाने कार मधील दोन तरुणांना चांगला चोप दिला. आमदार अनुप अग्रवाल यांनी वेळीच धाव घेत जमावाला शांत केले.

याप्रकरणी जयेश जुगनू मराठे याने शहर पोलिसात फिर्याद दिली, त्यानुसार रिजवान अहमद शाहिद शेख (रा. गरीब नवाज नगर धुळे), साहिल शेख अब्दुल रज्जाक (रा. जामचा मळा धुळे) या दोघांविरोधात गोतस्करिचा गुन्हा दाखल झाला. दुसऱ्या बाजूने रिजवान अहमद शाहिद शेख याने दिलेल्या फिर्यादीनुसार जयेश मराठे, सर्जेराव गावडे, नितीन काळोबा शिंदे, ओम शंकर साळुंखे, निलेश रघुनाथ साळुंखे, प्रणिल विभांडीक यांच्याविरुद्ध मारहाणीचा गुन्हा दाखल झाला. कारची तोडफोड करून नुकसान केले त्याच्या खिशातील हजार रुपये, चांदीची चैन गहाळ झाली, असे फिर्यादीत म्हटले आहे. शहर पोलिसांकडून तपास सुरू आहे.

## दोंडाईचात चौरेचाळीस लाखांचे प्रतिबंधीत बोगस बियाणे साठा जप्त

**धुळे, दि.२६ - शासनाने प्रतिबंधित केलेल्या बियाण्यांची विक्री करणाऱ्या एका संशयिताविरुद्ध दोंडाईचा (ता.शिंदखेडा) पोलिसात गुन्हा दाखल झाला. पथकाने त्याच्या घरातून एकूण ४४ लाख ६९ हजार ६०० रुपयांचा अनधिकृत बियाणांचा साठा जप्त केला. कृषी अधिकारी यांच्या पथकाने संशयिताच्या घरातून मोठ्या प्रमाणात हा अवैध कापूस बियाण्याचा साठा जप्त केला.**



शिंदखेडा तालुक्यात शेतकऱ्यांची फसवणूक होत असल्याच्या तक्रारी कृषी विभागाकडे येत आहेत. कृषी विभागाच्या पथकाने बियाण्यांचा काळाबाजार करणाऱ्यांचा शोध घेतला. दोंडाईचा येथील गरीब नवाज कॉलनीत निजाम कमरोद्दीन मन्सुरी याच्या घराची झडती घेतली. घरात शासनाने प्रतिबंधित केलेले कापूस बियाणे साठा केल्याचे आढळले. शेतकऱ्यांना बिल न देता विक्री करण्याच्या हेतूने अनधिकृतरित्या केल्याचे आढळले. शेतकरी व शासनाची दिशाभूल केल्याप्रकरणी कृषी अधिकारी मयूर गौतम भामरे यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार दोंडाईचा पोलिसात निजाम मन्सुरी याच्या गुन्हा दाखल झाला.

## नंदुरबारला युवकास मारहाण व लूट

नंदुरबार, दि.२६ (प्रतिनिधी)- आम्हाला २ तासांसाठी सूरत येथे काम आहे, त्या दिवसाला १३०० रुपये मिळतील, असे आमिष दाखवून धारावी मुंबई येथील युवकाला बोलावण्यात आले. रामचंद्र साव यांचे नातेवाईक मित्र पवन साव यांना प्रथम सूरत येथे बोलावून घेतले. त्यानंतर नंदुरबार येथे आणून एका निर्मनुष्य ठिकाणी नेण्यात आले. तेथे आरोपींनी फिर्यादी व त्याच्या मित्रांना धमकावत मारहाण केली. फिर्यादीच्या खिशातील २ मोबाईल व रोख रक्कम ५,००० रुपये असा एकूण ४०,००० रुपयांचा मुद्देमाल जबरदस्तीने काढून घेतल्याची तक्रार करण्यात आली आहे.

## निधन वार्ता

### साकरबाई मोरे



शहादा, दि.२६- धुळे तालुक्यातील बेहेड येथील मुळ रहिवासी व हल्ली मुक्काम निलगिरी सुरत येथील साकरबाई सोमा मोरे यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. मृत्यूसमयी त्या ९० वर्षांच्या होत्या. त्यांच्या पश्चात नातू, सून, ६ मुली, जावाई, नातवंडे असा परिवार आहे. त्या हर्षल श्रावण मोरे यांच्या आजी होत.

**पाहिजेत**
दुकानात कामासाठी हुशार व होतकरु मुले/मुली फूलटाईम/पार्टटाईम त्वरीत पाहिजेत.
- समक्ष भेटा -
मुंदडा बुक स्टॉल
पारोळा रोड ग.नं. ६, कॉर्नर, धुळे

**प्लॉट विकणे आहेत**
आर्वी NH-3 हायवेलगत केले नगर येथील गट नं.२२८ या ले-आऊट मधील प्लॉट विकणे आहे.
आर्वी NH-3 हायवेलगत श्रीकृष्ण नगर येथील गट नं.२३२ या ले-आऊट मधील प्लॉट विकणे आहे.
आर्वी NH-3 हायवेलगत भगवती विहार येथील गट नं.२६५/३/१ या ले-आऊट मधील प्लॉट विकणे आहे.
संपर्क - 9422792677, 8888192677

वीर सावरकर जयंती निमित्त शुभारंभ
**वीर सावरकर अपार्टमेंट**
फ्लॅट बुकिंग व भाड्याने देणे आहे.
फ्लॅट एरिया :- 1 BHK - 1000 स्के.फुट, 2 BHK - 1200 स्के.फुट, 3 BHK - 1350 स्के.फुट
बुकिंगसाठी संपर्क
मालक तात्यासाहेब रघुनाथ भगवान चौधरी
मो. 9405466937
इंजि.राजेंद्र के.खैरनार (बी.ई.सिव्हिल)
मो. 9422789513
पत्ता : वाणी मंगल कार्यालयाजवळ, भिडेबाग देवपूर, धुळे

**पाहिजेत**
दुकान कामासाठी तसेच ऑफिस कामासाठी माणुस पाहिजेत. इच्छुकांनी त्वरीत संपर्क करावा.
शक्ती ट्रेडर्स
प्रभाकर टॉकीज समोर, खंडेराव बाजार, धुळे
7588736772
7588736770

**पाहिजेत**
- नर्स (ANM GNM)
- R.M.O
- रिसेप्शनिस्ट
- B.Sc.ऑप्ट्रोमेट्रीस्ट
संपर्क
यशोदा हॉस्पिटल व नेत्रालय
दत्त मंदीर देवपूर, धुळे
मो. ८३२९२४९३८६

**पाहिजेत**
मेडीकल एजन्सीमध्ये कामासाठी मुले/मुली/महिला पाहिजेत.
-: संपर्क :-
8483032975
9823716975

**पाहिजेत**
इंडीयन ऑईल पंप लळींग पंपावर अनुभवी डिझेल/पेट्रोल वाटपासाठी मुले पाहिजेत. तसेच सफाईकामगार पाहिजे.
9822107518

**घर विकणे आहे**
भिडे बाग येथील ६ रुमचे घर १८०० स्के.फु सुमोर ३० वर्ष जुने बांधकाम असलेले घर योग्य किंमत आल्यास विकणे आहे.
-: संपर्क :-
एल.जी. प्रॉपर्टीज
9793093955

**पाहिजे**
लॉजींग कामासाठी मॅनेजर पाहिजे.
-: समक्ष भेटा :-
सुयोग लॉज
संकल्प दातांच्या दवाखान्या जवळ दसेरा मैदान चौक, मालेगांव रोड, धुळे

**भाड्याने देणे**
बांबू गल्लीत पहिल्या मजला दर्शनी रस्त्याकडील १००० फुटी हॉल वैद्यकीय व्यवसायासाठी उपयुक्त.
8408958097

**2 BHK फ्लॅट विकणे आहे**
फ्लॅट नं.९, कोणार्क अपार्टमेंट, प्रोफेसर कॉलनी, देवपूर, धुळे
-: संपर्क :-
7517488159

**अनारसे**
खास अधिक मासा साठी उत्तम प्रतीचे अनारसे मिळतील नोंदणी आवश्यक आहे. अनारसा पिठ उपलब्ध आहे.
मदर्स किचन
फूलवाला चौक,धुळे
9049902201
7887750864

**पाहिजेत**
हॉटेलसाठी
मॅनेजर - ०१
कारागीर - ०१
वेटर - ०२
कॅप्टन - ०१
लावणे आहे.
8805589555

**पाहिजेत**
FMCG Distributor मध्ये डिलिव्हरीसाठी इंग्रजी वाचता लिहता येणारे डिलिव्हरी बॉय, ड्रायव्हर पाहिजेत.
पत्ता - अग्रसेन चौकजवळ, धुळे
8767674975

New Models
ऑफर .... ऑफर .... ऑफर ....
Authorised Dealer
LG Panasonic Godrej


2026 New Model + Upto 30% डिस्काउंट + फ्री वाढीव वॉरंटी + १०% पर्यंत इन्स्टंट डिस्काउंट क्रेडिट कार्डवर*
0% फायनान्सची सुलभ E.M.I सुविधा उपलब्ध.*
आता मिळवा लेटेस्ट AC तेही 0% फायनान्स वर
श्री महावीर इलेक्ट्रीक ॲण्ड टी.व्ही.
श्रीराम मंदिराजवळ, फुलवाला चौक, आग्रा रोड, धुळे, फोनः (02562) 229162, 235763

हे पत्र संपादक, मालक, प्रकाशक, हेमंत सुधाकर मदाने यांनी हेमंत प्रिंटींग प्रेस, वीर सावरकर मार्ग, धुळे येथे मुद्रित करुन आपला महाराष्ट्र, जनशक्ती, वीर सावरकर मार्ग, धुळे-४२४००१ येथे प्रकाशित केले. दुरध्वनी मुख्य कार्यालय, धुळे (०२५६२) २३५३९६, २३८३९६, aplamaha@gmail.com नंदुरबार २२३४४४ aplamahashd@gmail.com शहादा-२५६९३९, मालेगाव-२४३१३३६, नाशिक-२५७५९८९, पुणे-९८२३०४६५२२, आपला महाराष्ट्र-रजि.नं.एम.एच.डी.आय.ए.१७ र.नं.११२२२/६०